




दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार २७ नोव्हेंबर २०२४ | अंक ३५३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# मी जर एक राऊंड मारला असता तर ?
# जरांगे पाटलांच्या विधानाची राज्यभर चर्चा

## तीच सासू आहे, वठणीवर आणणार

**मी समाजाला सांगितलं होतं तूमाला ज्याला पाडायचं त्याला पाडा आणि ज्याला निवडून आणायचं त्याला निवडून आणा. मी माझ्या भूमिकेपासून बदललो नाही म्हणून माझा समाज आज माझ्या पाठीमागे आहे. आता कोणीही आलं तरी आम्हाला काही फरक पडणार नाही. कोणीही आलं तरी समाजासाठी लढावं लागणार आहे. कोणीही येऊ द्या तीच सासू आहे. आम्ही वठणीवर आणू शकतो, असा इशारा त्यांनी दिला. पुन्हा आले वळवळ करसान दादागिरी करसान किंवा दहशत वाजवण्याचा प्रयत्न करताना तर त्याचा तुम्हाला खूप वाईट परिणाम भोगावे लागेल. मराठ्यांच्या नादी लागू नका, असे ते म्हणाले.**



## उपोषणाचा एल्गार

आता निवडणूक झाली तो विषय संपला मराठ्यांनी पटापट डोक्यातून काढून टाका. तुमचं काय तुमच्या जातीचं काय तुमच्या अस्तित्वाचं काय आणि तुमच्या लेकराचे भविष्य काय त्यामुळे आता आरक्षणाच बघा सगळ्या मराठ्यांनी आपल्या लेकराच्या भविष्याचा बघा.हे आता सामूहिक आमरण उपोषण आहे. एकाच दिवशी एकाच वेळी अंतरवाली सराटी मध्ये सामूहिक आमरण उपोषण होणार आहे. पुन्हा एकदा संपूर्ण मराठ्यांनी एकजूट होऊन सामुहिक आमरण उपोषणाला आंतरवाली सराटीतल्या तयारीला लागा. सरकार स्थापन झाल्यानंतर सामूहिक आमरण उपोषणाची तारीख मी जाहीर करणार आहे.त्यामुळे सर्वांनी आंतरवालीकडे यायचं आहे असा आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला केलं. आणि जोपर्यंत आरक्षण देत नाही तोपर्यंत हे उपोषण चालणार आहे हे आमरण उपोषण आंतरवाली सराटीमध्येच होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बीड : महायुतीच्या विजयानंतर प्रथमच मनोज जरांगे पाटील हे बीड मध्ये आले होते. यावेळी त्यांनी सरकार स्थापन होताच लगेच सामूहिक आमरण उपोषणाला बसणार असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले की निवडणूकीच्या मैदानात आम्ही नव्हतोतच त्यामुळे मराठ्यांचा रूबाब पूर्वी होता तसाच आहे, सरकार कोणाचेही असो आम्ही खंबीर आहोत असे मत पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. तसेच देशात झाले नाही असे आंदोलन आंदोलन सराटीत लवकरच उभारणार आहोत, या आंदोलनाने सरकारचे डोके बंद पडणार आहे. मी समाजासाठी खुप काही करून ठेवले आहे यापुढेही शरीराने साथ दिली तर खुप काही करायचे आहे असे भावनिक उद्गारही यावेळी जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना काढले राज्यात संपन्न झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत महायुतीला भरभरून यश आले. यामध्ये या निवडणूकीनंतर अनेक जणांकडून जरांगे फॅक्टर संपल्याचा उल्लेख करण्यात येत आहे. परंतु या निवडणूकीत आम्ही मैदानातच नव्हतो तर फॅक्टर ओसरल्याचा संबधच येत नाही, जर आम्ही या निवडणूकीत मैदानात उतरलो असतो आमचे समीकरणे जुळली असती तर या निवडणूकीत ८० ते ९० जणांना आम्ही बुक्काच लावला असता असे मत माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. सरकार स्थापन होताच अंतरवली सराटीमध्ये मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकदा आंदोलनाचा बडगा मनोज जरांगे पाटील उगारणार आहेत. परंतु यावेळेस हे आंदोलन मोठ्या स्वरूपाचे असणार असल्याचे संकेत त्यांनी यावेळी दिले. हे आंदोलन सामूहिक आमरण उपोषण या स्वरूपाचे असणार असून या उपोषणाला गावखेड्यातील सर्व मराठा बांधवांनी घरी एक माणूस ठेवून सर्वांनी आंतरवली सराटीकडे येण्याचे आवाहन मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला केले आहे. सरकार स्थापन होताच या आंदोलनाची तारीख जाहीर करण्यात येईल असेही जरांगे यावेळी म्हणाले



शिवसेना जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल स्वप्निल भैया गलधर यांना शुभेच्छा देताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक,बळीराम गवते, हनुमान मुळीक,राहुल वायकर,फय्याज पठाण.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड कार्यालयात संविधान दिन साजरा



बीड : शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यानिमित्ताने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिम`स वंदन केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रज्ञाताई खोसरे, प्रदेश सचिव संगीताताई तुपसागर, स्वयंरोजगार सेलचे जिल्हाध्यक्ष विजय पोकळे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजि.अजिंक्य आनेराव, योगेश शिंदे, अल्पसंख्याक आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्ष शाकेराताई शेख, महिला आघाडीच्या बीड तालुकाध्यक्ष संगीताताई वाघमारे, शहर सचिव अर्चनाताई देशमुख, जिल्हा सहसचिव नंदिनीताई ओव्हाळ, युवती उपाध्यक्ष नुजत शेख, ललितताई अडाणे, राणीताई शेख, युवतीच्या मोहिनीताई यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## उद्देशिका हा संविधानाचा आत्मा – महेंद्रकुमार कांबळे

बीड, दिनांक २६ : भारतीय संविधानामागील पार्श्वभूमी, भारतीय संविधानाची रचना, वैशिष्ट्ये, नागरिकांचे मुलभूत अधिकार आदी बाबींवर मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाची विविध पैलूंवर प्रकाश टाकत भारतीय संविधानाची उद्देशिका हा भारतीय संविधानाचा आत्मा असल्याचे प्रतिपादन निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिनानिमित्त मजाणून घ्या आपले संविधानफया विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविकपर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व सांगितले. मंचावर निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उप जिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, उप विभागीय अधिकारी श्रीमती कविता साधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाने, नायब तहसीलदार सुधाकर टाक, माधव काळे, श्रीमती नर्मदा उगलमुगले यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

# किनवट येथून युवक अयोध्येला रवाना



### प्रभू श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी किनवट येथून मोटरसायकलीने अयोध्येला रवाना झाले.

**नांदेड प्रतिनिधी** : बालाजी सिरसाट किनवट : आमदार भीमराव केराम यांचा विजय उत्सव साजरा करून दि.२५–नोव्हेंबर रोजी किनवट येथील युवक मोटार सायकलवर आयोध्याकडे रवाना झाले. मा.भीमराव केराम हे आमदार व्हावेत अशी मनाशी खूणगाठ बांधून प्रचारात मग्न असलेले मांडवा येथील त्यांचे कार्यकर्ते व्यंकट तोटावार, नरेश बंडेवार यांनी केराम साहेब आमदार व्हावेत आणि आपण प्रभू श्रीरामाचे आयोध्येला जाऊन दर्शन करू अशी संकल्पना त्यांनी आपल्या मनात बाळगली होती. आ.भीमराव केराम हे निवडून येऊन त्यांचे स्वप्न पूर्णत्वास आले आणि त्यांचे अयोध्येला जाण्याचे स्वप्नपूर्ण झाले.ते युवक सोमवारी किनवट येथून प्रभू श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी किनवट येथून मोटरसायकलीने अयोध्येला रवाना झाले. यावेळी पत्रकार बालाजी पाटील सिरसाट,महेश कनकावाड,आशिष राठोड,व्यंकट बिनेवार, जिगेस पवार,मनीकंटा पबतवार आदी मित्रमंडळींनी त्यांचे स्वागत करून समोरील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

# सर्वसामान्यांची शक्ती म्हणजेच भारतीय संविधान– प्राचार्य गणेश पोकळे



**बीड (प्रतिनिधी)**
बीड दि २६ भारतीय संविधानाचा नावलौकिक संपूर्ण जगात असून सर्वसामान्यांची शक्ती म्हणजेच संविधान हे समीकरण स्वातंत्र्यापासून बनले असून संविधानामुळेच दुबळ्यांचे सशक्तिकरण शक्य झाले असल्याचे प्रतिपादन प्राचार्य गणेश पोकळे यांनी व्यक्त केले.वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणकशास्त्र महाविद्यालय व संभाजीराजे ग्रंथालय व व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय, बीड येथे आयोजित संविधान दिनाच्या कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.पुढे बोलताना त्यांनी समाजामध्ये न्यायसमाज व्यवस्था निर्माण करण्यात संविधानाची भूमिका अत्यंत महत्त्व राहिले आहे. संविधानामुळेच अनेक जटिल सामाजिक समस्या सोडविता आल्या असेही असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रप्राचार्य बप्पासाहेब हावळे, प्रा. शिवशंकर पटवारी, प्रा. सुहास गाढवे, प्रा. राजश्री महाजन, प्रा. फिरोज शेख, प्रा. कोमल सुरवसे, याबरोबरच महेश नेवडे, दीपक जाधव, इमरान शेख, सचिन चौरे आणि श्रीमती संध्या खोसे यांची उपस्थिती होतीयाच कार्यक्रमात मुंबईतील २६ ११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचा अभ्यास करावा– डॉ. सुहास मोराळे

**माजलगाव प्रतिनिधी दिनांक २६/११/२०२४**
श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव जिल्हा बीड येथे संविधान दिन कार्यक्रम राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना व संविधानाचे वाचन डॉ. जिजाराम बागल राज्यशास्त्र विभाग यांनी केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी भारतीय राज्यघटनेचे महत्त्व विशद केले. भारतीय संविधान हा जगातील महत्त्वाचा ग्रंथ आहे. अमेरिका व इंग्लंड यापेक्षा भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ आहे. समानता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य या चतुसूत्रीचा विचार यामध्ये केलेला आहे. भारतामध्ये लोकशाही शासनपद्धतीमध्ये संविधानाची महत्त्वाची भूमिका आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना पंडित नेहरू यांच्याकडे सुपूर्त केली म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा




केला जातो. भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी २०१५ पासून संविधान दिन सुरू केला. तसेच त्यांनी भारतीय संविधान हे सर्व विद्यार्थ्यांसाठी कशा पद्धतीने उपयुक्त आहे याचा अभ्यास सर्वांनी केला पाहिजे. भारतातील सर्व स्पर्धा परीक्षेसाठी भारतीय राज्यघटना हा विषय महत्त्वाचा आहे. आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांमध्ये पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी संविधान हा विषय अनिवार्य केला आहे. म्हणून प्रत्येकाने भारतीय नागरिक म्हणून भारतीय संविधानाचा अभ्यास करावा असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केला. भारतीय तरुणांनी संविधानात दिलेले मूलभूत अधिकार आणि कर्तव्य याचा अभ्यास करून तशा पद्धतीने वर्तन करावे. यातूनच राष्ट्राचा व समाजाचा विकास झाला पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते, डॉ. विकास बोरगावकर, डॉ. राजाराम जाधव, डॉ. जिजाराम बागल, प्रा. दिनेश गडदे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# जीवघेणी स्पर्धा आणि हताशा

अपेक्षा वाढल्या की स्पर्धेत उतरावे लागते. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा असते. ती कोणालाही चुकत नाही. लोकसंख्येच्या विस्फोटामुळे असेल, पण ही स्पर्धा गेल्या पाव शतकात जीवघेणी झाली आहे. शिक्षणातून आयुष्याची सुरुवात होते. तीही कोणाला टळत नाही, पण या पहिल्या टप्प्यावरची स्पर्धा नकोशी वाटण्याइतकी तीव्र झाली आहे. मूल झाले की पालकांच्या मनात चिंता सुरू असते, याला कोणती शाळा मिळणार? ज्यांचा खिसा मोठा त्यांना ही चिंता पडू नये ही स्थिती, पण गेल्या पाव शतकातीलच. नर्सरी किंवा केजीला डोनेशन मागणे याची सुरुवात १९८०च्या दशकापासून झाली. पण डोनेशनची गरजच पडू नये इतकी प्रचंड फी असणाऱ्या संस्थांमध्ये, ङ्गया आणि फी भरून प्रवेश घ्या,फही पद्धत नवीन शतकात आता रुळली आहे. अशा अनेक शाळा मोठ्या जाहिराती देऊन मुले मिळवत आहेत, मात्र शाळा कोणतीही असो, प्रवेश मिळाला की स्पर्धा सुरू होते. प्रगती पुस्तकावर दिसणारे स्टार केजीतून सहावीत पोहोचेपर्यंत नाहीसे होत जातात. एकेक स्टार गळतो, पालकांची चिडचिड वाढवतो. त्याचा परिणाम मुलांना स्पर्धेत ढकलण्यासाठी होतो. निकालाच्या दिवशी मुलांचे मार्क बघून जास्त मार्क असलेल्यांचे पेपरमध्ये नजर टाकणाऱ्या आयांची संख्या वाढवणारे हे नकोसे दिवस आणि माझ्या मुलाचा अर्धा मार्क का कापला म्हणून शिक्षकांना पालकांना तोंड द्यावे लागण्याचेही हेच दिवस. एखाद्या पदवीनंतर नोकरी मिळाली याचा आनंद बरोबरच्या मित्राचा पगार ऐकून मावळण्याचे दिवस याच काळातील. ऐकीव गोष्टी अनभिज्ञ पालकांपर्यंत पोचल्यामुळे अमक्याला इतका पगार मिळाला म्हणून आता मुलांना त्या कोर्सला घालू या असे विचार सुरू झाले. वृत्तपत्रात पहिल्या पानावर येणाऱ्या पॅकेजच्या बातम्या ऐकून ही तुलना वाढत गेली. ङ्गवाढता वाढता वाढे ग्रासिले नोकरी मंडळफ याचा दूरगामी परिणाम आता गेल्या पाचसात वर्षांत दिसत आहे. इंजिनीअर झाल्यानंतर उगाचच इतर कोर्सेस करणाऱ्यांची संख्या किंवा स्पर्धा परीक्षांच्या मृगजळामागे जाणाऱ्यांची संख्या वारेमाप वाढली. शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत मुलींना ३० टक्के आरक्षण मिळाल्याने उच्चशिक्षित मुलींची संख्या वाढली, तशा त्यांच्या अपेक्षा वाढल्या आणि लग्न होण्याचे वय दोघांच्याही बाबतीत तिशीला जाऊन पोहोचले. ङ्गमुलाला एवढाच पगार मिळतो?फ हा तुलनेतून येणारा प्रश्न लग्नाच्या बाजारातला आजचा परवलीचा बनला आहे. पंचवीस वर्षांपूर्वी बारावीनंतरच डीएड केले, पदवी मिळवून बीएड केले, पदव्युत्तर करून बीएड केले तर नोकरी पक्की, अशी स्थिती होती. यातून शेकडो डीएड, बीएडची कॉलेजे निघाली. काहींना नोकऱ्या मिळाल्या. ते सुस्थितीत आहेत. पण अशा शैक्षणिक पदव्या घेऊन बाहेर पडणाऱ्यांची संख्या चौपट झाल्यामुळे शिकवणाऱ्या इच्छुकांची संख्या एका जागेला पंधरा अर्ज इतकी वाढली. इंग्रजी माध्यमातून शिकलेल्यांना, कमी पगारावर का होईना नोकऱ्या मिळत होत्या. त्याचे प्रमाणही गेल्या पंधरा वर्षात ढासळले. शैक्षणिक क्षेत्रात कंत्राटी पद्धतीत घड्याळी तासावर काम करणारे म्हणजेच इंग्रजीतून सीएचबी(क्लॉक अवर बेसिस) असे गोंडस नाव देऊन हे शिक्षकांचे प्रमाण आता ४० टक्क्यांपर्यंत पोचले आहे. लाखो शिक्षक उपलब्ध झाल्यानंतर सरकारही खडबडून जागे झाले. शिक्षक बनायचे असेल तर टीईटी, प्राध्यापक व्हायचे असेल तर सेट किंवा नेट उत्तीर्ण व्हावे लागेल, हा कठोरपणे अमलात आणला गेलेला नियम याच काळातील. एक ताजी बातमी यावर प्रकाश टाकते. टीईटी परीक्षेत गैरप्रकार होऊ नयेत म्हणून कठोर उपाय योजले आहेत. कॉपी करून शिक्षक बनणार तर ते विद्यार्थ्यांना काय शिकवणार? हा प्रश्न याच काळातील आहे. हीच कंत्राटी पद्धत हळूहळू व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्येही रुजली. इंजिनीअरिंग, मेडिकल, फार्मसी, मॅनेजमेंट, आर्किटेक्चर अशा अभ्यासक्रमांत खासगी संस्थांत कंत्राटी काम करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या वाढते आहे. खासगी विद्यापीठांची स्थापना याच काळातील. एकेकाळी पुणे शहरात फक्त एक विद्यापीठ होते, तिथे विद्यापीठांचा आकडा पंचविशी पार करून गेला आहे. या खासगी विद्यापीठातील प्रत्येक इमारत, बसण्यास बाके, मैदाने, सुखसोयी या आकर्षक असल्यामुळे फीकडे दुर्लक्ष करून पालक विद्यार्थ्यांचा ओढा तिकडे वळू लागला, यात नवल ते काय? याच विद्यापीठांनी एक छान पद्धत रुळवली आहे. दहावीनंतर मुलाला आमच्याकडे आणून सोडा. तो तीन वर्षांचा डिप्लोमा, तीन वर्षाचे इंजीनीअरिंग, दोन वर्षाचे एमबीए करवून त्याला नोकरीची आम्ही आम्हीच देतो. सधन पालकांच्या बोलण्यातील एक नवीन वाक्य म्हणजे, ङ्गनुसती पदवी आयुष्यभर पुरते काय? सलग शिकून पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर ती नोकरी वगैरे काय ते पाहा.फया वाक्याला आधार काय?असे अनेक पालकांना मी विचारतो. त्याचे मला समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. मेडिकल सोडले तर अन्य क्षेत्रात हे तितकेसे उपयुक्त ठरत नाही, हे एक वास्तव. नवीन शतकाच्या सुरुवातीला पाच लाखांचं पॅकेज मोठ समजलं जायचं. त्याचं रूपांतर सध्या मिळणाऱ्या नोकरीत पाच लाखाचे पॅकेज असेल तर ङ्गएवढेचफ म्हणून विचारले जाते? पण हा प्रश्न विचारणाऱ्याला जेव्हा तू आमच्याकडे काय काम करू शकतोस? असे विचारले असता तुम्ही शिकवाल ते, अस` उत्तर मिळते. हा बदल गेल्या पंधरा–वीस वर्षांतला. शंभर कामगार असणाऱ्या कारखानदार मेकॅनिकल इंजिनीअरचा नुकताच इंजिनीअर झालेला मुलगा पुढे काय शिकू, म्हणून कौन्सिलिंगला आल्यावर, ङ्गमी वडिलांच्या कारखान्यात शिकताना कधीच गेलो नाही,फ असे उत्तर देतो तेव्हा या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येते. एमबीबीएस झालेली असंख्य मुलेमुली हाती पदवी आल्यावर तीन–तीन वर्षे एकही पेशंट न बघता फक्त पीजी नीटचा अभ्यास करत राहतात. ही दोन उदाहरणे सगळ्यात जास्त मागणी असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची आहेत. तर पारंपरिक बीए, बीकॉम, बीएस्सीची अवस्था काय असेल, याचा अंदाज वाचकांनीच बांधावा. निवांत घरी बसून करिअरच्या शोधात असलेला पंचवीशीतला मुलगा, मुलगी आता सहजगत्या मध्यमवर्गीय घरात सापडतात. नेटवर रोज रात्री नित्यनेमाने ङ्गरिसर्चफ करण्याचे काम ते करत असतात! अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत की येते ती हताशा. अशा हताश व्यक्तीचे कोणत्याही कामात मन लागत नाही. सतत माझ्या हाती काय व दुसऱ्याला मिळते काय याची तुलना मनात चालू राहते. ते मिळवण्याचे अवैध मार्ग कोणते, याचा धांडोळा घ्यायची सुरुवात याच पाव शतकातील. या अवैध मार्गांना विरोध करणारे आता त्यात फारसे गैर काही नाही, असे मानू लागले आहेत. हे आपल्या शिक्षण व्यवस्थेचे घोर अपयश मानावे लागेल. कायम नोकरीसाठी, हव्या त्या ठिकाणी बदलीसाठी, बदली होऊ नये यासाठी, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदातील शिक्षण संस्थांत ज्ञानदानाचे पवित्र काम करणाऱ्यांना लाखा लाखांनी पैसे मागण्याची सुरुवात याच काळातील. अनुदानित संस्थेत कायम करून घेतले की निवृत्ती वेतनासकट कायमची सोय होणार आहे, तर त्यासाठीची टक्केवारी आधीच काढून घेण्याची उघड उघड सुरुवात ज्या दिवशी झाली, त्या दिवशी या घसरणीला सुरुवात झाली. काही खासगी संस्थापुरते असलेले हे लोण इतर संस्थांमध्ये आता करोनाच्या साथीप्रमाणे पसरले आहे. असे हताश झालेले कंत्राटी शिक्षक राज्याच्या हरएक गावी सापडतात. यांनी मोर्चे काढले, आझाद मैदानावर मुक्काम टाकला, मंत्रालयात जाऊन निवेदने दिली तरी मंत्रालयातील मंडळी शिक्षण संस्था चालवत असल्यामुळे तोंडाला पाने पुसली जातात. मात्र याचे परिणाम केजी पासून पीजी पर्यंत शिकणाऱ्या दोन कोटी विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना भोगायला लागत आहेत. आत्महत्या हा हताशेनंतर येणारा शेवटचा उपाय. वयाच्या आठ ते चोवीसाव्या वर्षापर्यंत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांनी देशातील शेतकरी आत्महत्यांचा आकडा कधीच ओलांडला आहे. २००७ च्या ६६५४ पासून आता एका वर्षात १३०४४ विद्यार्थी आत्महत्येपर्यंत तो पोचला आहे. म्हणजे दर पन्नास मिनिटांत एक विद्यार्थी जीव गमावतो आहे. त्याची दखल कोणालाही घ्यावीशी वाटत नाही. कारण एकच, गेल्या पाव शतकात पालक आणि विद्यार्थ्यांच्या फुगलेल्या अपेक्षा, तीव्र स्पर्धा, इतरांशी तुलना, त्यातून येणारी हताशा याकडे केली जाणारी डोळेझाक फार भीषण आहे.

# संसदेतील गोंधळींना, आवरणार कसे?

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. नवीन संसद भवनात नव्या लोकसभेचे हे पहिलेच हिवाळी अधिवेशन आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींच्या भगिनी प्रियंका गांधी वड्रा या केरळमधील वायनाड मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत खासदार म्हणून निवडून आल्या. गांधी घराण्यातील दोघे भाऊ–बहीण आता लोकसभेत कार्यरत आहेत, साहजिकच काँग्रेसच्या खासदारांमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षाने लोकसभा व राज्यसभेत मोठा गोंधळ घातला व कामकाज रोखून धरण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम संसदेच्या दोन्ही सभागृहातील काम अध्यक्ष व सभापतींना तहकूब करण्याचा आदेश द्यावा लागला. देशाच्या क्षितीजावर मोदी पर्वाला सुरुवात झाल्यापासून काँग्रेस पक्षाची घसरण सुरू झाली. सन २०१४ च्या निवडणुकीत तर काँग्रेसचे अक्षरश: पानीपत झाले होते. पक्षाचे अवघे ४४ खासदार निवडून आले. नंतर २०१९ मध्ये त्यात थोडीफार सुधारणा झाली. पण विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता मिळविण्यासाठी खासदारांची जी किमान संख्या लागते. तेवढेही खासदार काँग्रेसला दोन्ही वेळा निवडून आणता आले नाहीत. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे शंभर खासदार निवडून आले आणि आता प्रियंका गांधी वड्रा या लोकसभेवर निवडून आल्याने पक्षाच्या खासदारांत उत्साह संचारला आहे. जनतेचे प्रश्न संसदेत मांडणे, त्याकडे सरकारचे लक्ष वेधून घेणे, जनतेला न्याय मिळवून देणे आणि सरकारच्या बेलगाम कारभारावर लगाम घालणे, हे विरोधी पक्षांचे कर्तव्य असते. लोकसभेच्या सलग तीन निवडणुकांमध्ये काँग्रेसला केंद्राची सत्ता मिळाली नाही. तसेच महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची धुळधाण



झाली. महाराष्ट्रात महायुतीची सत्ता हटवणार व महाआघाडीचे सरकार स्थापन होणार अशी काँग्रेस हायकमांडने अटकळ बांधली होती. यावर्षी पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात महाआघाडीने भाजपापेक्षा मोठे यश मिळवले. राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी तब्बल ३१ मतदारसंघांत महाआघाडीचे (इंडिया) चे खासदार विजयी झाले. अवघ्या १७ मतदारसंघांत महायुतीचे खासदार निवडून आले होते. लोकसभेत यश मिळाले म्हणून काँग्रेस व उबाठा सेनेने आपल्याला विधानसभा निवडणुकीतही मोठे यश मिळणार असे गृहीत धरले होते. मतदारांच्या मनात नेमके काय आहे याचा त्यांना थांगपत्ता लागाला नाही. प्रत्यक्षात निकालानंतर महायुतीला पळता भुई कशी थोडी झाली, हेच जनतेला दिसून आले. महाराष्ट्रातील पराभवाच्या नैराश्येतून विरोधी पक्ष संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गोंधळ घालत असेल, तर जनेतवर अन्याय करणारे ठरेल. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मणिपूरमधील हिंसाचार, उत्तर प्रदेशमधील संभल येथे झालेला हिंसाचार व गोळीबार आणि उद्योगपती गौतम अदानींवर अमेरिकेतील न्यायालयाने ठेवलेले आरोप या मुद्द्यांवरून विरोधी पक्षांनी मोठा गोंधळ घातला. त्याचा परिणाम दोन्ही सदनातील कामकाज पिठासीन अधिकाऱ्यांना तहकूब करावे लागले. कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षाचे सदस्य निघून गेले. मग कामकाज तहकूब करण्याचा त्यांचा हेतू तरी काय होता ? संसदेत खासदार म्हणून निवडून जाणे हे जबाबदारीचे आहे. आपले दायित्त्व देशातील जनतेशी आहे. जनतेच्या अपेक्षा, आकांक्षा आणि भावनांचे प्रतिबिंब देशाच्या सर्वोच्च संसदीय व्यासपीठावर मांडणे, जनतेच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधून घेणे व जनतेला न्याय मिळवून देणे हे लोकप्रतिनिधींचे काम आहे. या लोकप्रतिनिधींना गलेलठ्ठ वेतन व भत्तेही दिले जातात. मग गोंधळ घालून कामकाज ठप्प कशासाठी करतात, त्यातून त्यांना काय मिळते? हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारला संविधानात बदल करायचा आहे, असा आरोप करून विरोधी पक्षाने हुल्लडबाजी केली. लोकसभा निवडणुकीत याच मुद्याचे विरोधी पक्षाने मोठे भांडवल केले होते, ङ्गअब की बार ४०० पारफ अशी भाजपाने लोकसभा निवडणुकीत घोषणा दिली होती. संविधानात बदल करण्यासाठी भाजपाला एवढ्या खासदारांची संख्या हवी आहे असे विरोधी पक्षाने प्रचारात म्हटले होते. त्याचा लाभही काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांना निवडणुकीत झाला.आता हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विरोधी पक्षाने पुन्हा या मुद्द्याचा शस्त्र म्हणून वापर करायला सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सदनात चांगली व सविस्तर चर्चा घडवावी अशी विरोधी पक्षांकडून अपेक्षा व्यक्त केली आहे. संसदेत गोंधळ घालून व आराडाओरड करून कामकाज बंद पाडण्याचे काम मूठभर सदस्य करीत असतात; पण त्याने लोकांचे प्रश्न सुटत नाहीत. विशेष म्हणजे जे नवीन सदस्य आहेत त्यांना प्रश्न मांडण्याची किंवा भाषण करण्याची संधी मिळत नाही. नवीन सदस्य मोठ्या उत्साहाने व उमेदीने निवडून आलेले असतात. सभागृहातील कामकाजात सहभागी होण्याची त्यांची मनापासून इच्छा असते; पण सदनात वारंवार गदारोळ व गोंधळच होणार असेल व कामकाज बंद पाडले जाणार असेल, तर नवीन सदस्यही नाऊमेद होतील, याचे गोंधळी खासदार भान ठेवत नाहीत. मोदी सरकारने अधिवेशनात कोणत्याही विषयांवर चर्चा घडविण्याची सरकारची तयारी आहे असे म्हटले आहे. मग प्रश्न मांडून लगेचच चर्चा घडवावी, असा विरोधी पक्षांनी हट्ट धरणेही योग्य नाही. मोदी सरकारच्या पहिल्या दोन टर्ममधे लोकसभेला विरोधी पक्षनेता नव्हता, आता राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांनी सरकारशी संवाद साधून विविध विषयांवर चर्चा घडवली पाहिजे. केवळ आरोप करायचे, गोंधळ घालायचा व कामकाज बंद पाडायचे हे विरोधी पक्षाचे काम नव्हे, पण त्यांना हे समजावून कोण सांगणार ?

# पश्चिम रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या ८३ रेल्वेगाड्यांच्या थांब्यात मोठे बदल

मुंबई : मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन या भारतीय रेल्वेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी मोठे बदल करण्यात येत आहेत. याअंतर्गत, अहमदाबाद येथे बुलेट ट्रेन आणि अहमदाबाद स्थानक पुनर्विकासाच्या कामांसाठी पश्चिम रेल्वेमार्गावरून सुटणा–या लांब पल्ल्याच्या एकूण ८३ रेल्वेगाड्यांचा गुजरातमधील शेवटचा थांबा बदलण्यात आला आहे. नॅशनल हाय स्पीड रेल्वे कॉर्पोरेशन (एनएचएसआरसीएल) आणि रेल्वे लँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या () कार्यक्षेत्रात येणा–या कामांमुळे अहमदाबाद येथून सुटणा– या आणि अहमदाबाद येथे थांबा असलेल्या मेल, एक्स्प्रेस आणि मेमू गाड्यांच्या थांब्यांमध्ये बदल करण्यात आला आहे, असे पत्र रेल्वे मंडळाच्या कोचिंग विभागाचे संचालक संजय नीलम यांनी देशातील सर्व क्षेत्रीय रेल्वे महाव्यवस्थापकांना सोमवारी पाठवले आहे. मुंबईहून सुटणा–या कर्णावती,



वातानुकूलित डबलडेकर, गुजरात एक्स्प्रेस अशा लोकप्रिय रेल्वेगाड्यांचा यात समावेश आहे. एकूण ४५ रेल्वेगाड्यांचा प्रवास अहमदाबादऐवजी साबरमती, वटवा, राजकोट, असारवा येथे संपणार आहे. १२ रेल्वेगाड्या अहमदाबादऐवजी मणिनगर येथून प्रवास सुरू करणार आहेत. ३४ गाड्यांचा अहमदाबाद स्थानकातील थांबा काढण्यात आला आहे. या गाड्यांना प्रवाशांच्या सुविधेसाठी मणिनगर आणि साबरमती स्थानकात अतिरिक्त थांबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील अत्यंत वर्दळीच्या रेल्वे टर्मिनलमध्ये अहमदाबाद रेल्वे टर्मिनलचा समावेश होतो. देशातील पहिल्या बुलेट ट्रेन टर्मिनलचे बांधकाम अहमदाबादमध्ये होत आहे. त्याचबरोबर, आरएलडीएकडून २३०० कोटींहून अधिक गुंतवणुकीच्या माध्यमातून अहमदाबाद स्थानकाचा पुनर्विकास करण्यात येत आहे. भविष्यातील या सुधारणा लक्षात घेता, लां पल्ल्याच्या काही रेल्वेगाड्यांच्या थांब्यांमध्ये बदल करण्यात येत आहे. बदललेल्या थांब्यांची अमलबजावणी लवकरच करण्यात येणार असून त्याची सविस्तर माहिती समाज माध्यमांतून देण्यात येईल, असे पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या कामांत गुजरात राज्याने आघाडी घेतली आहे. बुलेट धावण्यासाठी वापी ते सुरत या दरम्यान खरेरा नदीवरील नऊ पुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. दरम्यान, मुंबईतील वांद्रे–कुर्ला संकुलातील बुलेट ट्रेन स्थानक आणि सावली (घणसोली) येथील खोदकाम १०० टक्के झाले आहे. विक्रोळी येथे शाफ्टसाठीचे खोदकाम अंतिम टप्प्यात आले आहे

# महायुतीवर महाविश्वास,महाआघाडीवर अविश्वास

राज्य विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीत भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) या तीन पक्षांच्या महायुतीने देदीप्यमान विजय संपादन केला. विधानसभेच्या २८८ पैकी २३० पेक्षा जास्त जागांवर विजय संपादन करून विधिमंडळाच्या इतिहासात एक नवा विक्रम निर्माण केला. भारतीय जनता पक्षाने, तर २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाचे शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणून एक इतिहास निर्माण केला. गद्दारांना पाडा, अदानींना हटवा अशा घोषणांचा घोशा लावणाऱ्यांना आणि ङ्गमुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेफ्ला विरोध करणाऱ्यांना जनतेने धडा शिकवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच शब्दात सांगायचे तर सावत्र भावांना बहिणींनी या निवडणुकीत जोडा दाखवला. यंदाची विधानसभेची निवडणूक महायुती व महाआघाडीच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेची होती. राज्यात गेल्या पाच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना असे अडीच वर्षे महाआघाडीचे सरकार होते आणि नंतर शिवसेना व राष्ट्रवादीत झालेल्या बंडानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा, शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी (अजितदादा) या पक्षांचे महायुतीचे सरकार जनतेने अडीच वर्षे अनुभवले. महायुतीचे सरकार चांगले होते की महाआघाडीचे असा मुद्दा यंदाच्या निवडणुकीत होता. मतदारांनी महायुतीवर महाविश्वास प्रकट केला, तर महाआघाडीवर अविश्वास दाखवला. असे का झाले, याचे आत्मचिंतन महाआघाडीच्या तिनही पक्षांनी केले पाहिजे. केवळ नकारात्मक भूमिका घेऊन राजकारण करणे अंगलट येते तसेच दुसऱ्याला सतत गद्दार म्हणताना आपण खूप प्रामाणिक आहोत असा आव आणणे हेही जनतेला पसंत पडलेले नाही. माजी केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी या निवडणुकीत कमाल केली. सिंधुदुर्ग जिल्हा म्हणजे राणेच हे निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा जनतेनेच सिद्ध करून दाखवले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनतेचा सर्वाधिक विश्वास नारायण राणे व त्यांच्या परिवारावर आहे हे निकालानंतर स्पष्ट झाले. कुडाळमधून निलेश राणे, कणकवलीतून नितेश राणे आणि सावंतवाडीतून दीपक केसरकर निवडून आले. संपूर्ण जिल्ह्याने महायुतीला भरभरून मतदान केले. सन २०१४ मध्ये वैभव नाईक यांनी नारायण राणे यांचा पराभव केला होता, त्या पराभवाचे उट्टे निलेश राणे यांनी यावेळच्या निवडणुकीत काढले. आपल्या हिंदुत्वाला मतदारांनी पसंती दिली, हिंदुत्व हे सर्वमान्य आहे हेच निकालाने दाखवून दिले अशी प्रतिक्रिया नितेश राणे यांनी दिली, तर शिवसेना खरी कोणाची याचे उत्तर जनतेने मतदानातून दिले असे दीपक केसरकर यांनी म्हटले आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात मिळून विधानसभेचे आठ मतदारसंघ आहेत, पैकी सात मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांच्या विजयी मिरवणुका निघाल्या. शिवसेनाप्रमुखांच्या हयातीत कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला ओळखला जात असे. त्याच बालेकिल्ल्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उबाठा सेनेला सर्वत्र पराभव पत्करावा लागला आहे. कोकणातील जनतेने उबाठा सेनेला या निवडणुकीतून हद्दपार केले आहे. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत नारायण राणे यांनी रत्नागिरी–सिंधुदुर्ग मतदारसंघातून प्रचंड विजय मिळवला. उबाठा सेनेला धूळ चारली. आता राणे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीत महायुतीने उबाठा सेनेचा धुव्वा उडवला. राज्यात जिथे–जिथे खोटे नाटे आरोप करून, बनावट कथानके रचून आणि पक्ष सोडून गेलेल्या आमदारांना गद्दार असे संबोधून त्यांना पाडण्याचे आवाहन उबाठा सेनेने केले, तेथे उबाठा सेनेलाच फटका बसला. हिंदुत्वाचा त्याग करून उद्धव ठाकरे यांनी महाआघाडी सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद मिळवले ते लोकांना पसंत नव्हते. निवडणुका भाजपाबरोबर युती करून लढवायच्या व नंतर काँग्रेसबरोबर आघाडी करून सरकार स्थापन करायचे हा डबल गेम महाराष्ट्रातील जनतेला आवडला नव्हता. २०१९ मध्ये जनतेने ठाकरे यांच्या पक्षाला काँग्रेसच्या विरोधात मतदान केले होते, पण निकालानंतर त्यांनी काँग्रेसशी केलेला घरोबा जनतेला पसंत पडला नाही. त्याची शिक्षा विधानसभा निवडणुकीत मतदारांनी उबाठा सेनेला दिली. दारुण पराभव झाल्यानंतर ईव्हिएम मशीनवर संशय घेणे आणि ईव्हिएम मशीन्स मॅनेज केली असे सांगणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असे म्हणावे लागेल. राहुल गांधी यांच्या भगिनी प्रियंका गांधी या केरळमधील वायनाड मतदारसंघातून लोकसभेवर चार लाखांचे मताधिक्य घेऊन निवडून आल्या. उबाठा सेनेचे भांडुपच्या प्रवक्त्यांचे बंधु हे विक्रोळी मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले, पक्ष प्रमुखांच्या परिवारातील एक जण वरळीतून व दुसरा वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडून आला, झारखंडमध्ये तर झारखंड मुक्ती मोर्चा पुन्हा सत्तेवर आला, जेलमध्ये राहिलेले मुख्यमंत्री हेमंत सोरेनसुद्धा पुन्हा निवडून आले. जिथे महाआघाडी किंवा इंडियाचे आमदार निवडून आले तिथे मात्र ईव्हिएम मशीन्स एकदम व्यवस्थित होती आणि पराभव झाला तिथे गडबड होती असे दुटप्पी बोलण्यावर कोण विश्वास ठेवणार? आपण निवडून आलो तर जनादेश मिळाला म्हणून सांगायचे, पराभूत झालो तर ईव्हिएम मशीन्समधे गडबड केली असा आरोप करायचा, हा खोटारडेपणा झाला. इंदिरा गांधींच्या काळातही काँग्रेस पक्षाला १९७१ च्या निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळाल्यावर हा विजय बाईचा नाही, गाईचा नाही, तर शाईचा आहे असा आरोप झाला होता. तेव्हा तर निवडणुकीत मतपत्रिका होत्या. पराभूत झाल्यावर निवडणूक यंत्रणा व व्यवस्थेवर खापर फोडायचे व आपल्या दुर्बलतेला झाकायचे त्यातलाच हा प्रकार आहे. विधानसभा निवडणुकीत जनतेने दिलेला निकाल खुल्या मनाने स्वीकारावा आणि भाजपाने जे भव्य दिव्य यश संपादन केले त्याबद्दल देवाभाऊंचे अभिनंदन

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकआरंभ — लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com


# अनाधिकृत होर्डिंग्ज मुळे शहराचे विद्रुपीकरण ; वाहतुकीस अडथळा, अपघाताला निमंत्रण ; मात्र सीईओ नीता अंधारे यांचे अभय ; नगरपरिषद प्रशासन संचनालयाला तक्रार :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२६ ) बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अनाधिकृत होर्डिंग्ज मुळे शहराचे विद्रुपीकरण होत असुन विना परवाना बॅनर लावणा-या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद असतानाही राजकीय पुढा-यांच्या निवडी,शहरात स्वागत, लोकप्रतिनिधी निवडून आल्याने शुभेच्छा देणा-या अनाधिकृत होर्डिंग्जची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सुंदर दिसणारा छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पर्यायाने शहराचे विद्रुपीकरण होत आहे.संबधित प्रकरणात लेखी तक्रार देऊनही सीईओ नगरपरिषद नीता अंधारे जाणिवपूर्वक कारवाई करणे तर दुरच परंतु अनाधिकृत होर्डिंग्जला अधिकृत करण्याचा घाट नगरपरिषद करत असुन त्यांना बीडकरांच्या जीवाशी काही सोयरसुतक नसल्याचे दिसून येत असुन संबंधित प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांना लेखी तक्रार केली आहे.




**सविस्तर माहितीस्तव**

मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग्ज कोसळुन झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला होता.त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी १७ मे २०२४ रोजी बीड नगरपरीषदेला त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये याबाबतच्या तातडीच्या उपाययोजना करण्यात येऊन विना परवाना होर्डिंग्ज, बॅनर,फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर, बॅनर,फलक २४ तासांच्या आत काढुन घेण्यात यावा नसता मुदतीनंतर होर्डिंग्ज धारकां विरोधात रितसर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत व होर्डिंग्ज लावण्यासाठी आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर, फलक काढुन घेऊन त्यासाठी लागणारा खर्च रितसर वसुल करण्यात यावा असे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने बीड शहरातील ७१ अनाधिकृत होर्डिंग्ज हटवण्यासाठी नगर पालिकेने संबंधित ५ लोकांना पत्र दिले होते.यात २४ तासांची मुदत देत फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा ईशाराही दिला होता मात्र सीईओ नीता अंधारे यांनी कारवाई करण्याऐवजी अनाधिकृत होर्डिंग्जला अधिकृत करण्याचा घाट घालत त्यांची पाठराखण केल्याचे दिसून आले.

**सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालयाच्या आदेशाला केराची टोपली :- डॉ.गणेश ढवळे**

बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाई न करताच स्ट्रक्चर ऑडिटच्या नावाखाली होर्डिंगला वय ठरवून अनेक वर्षापासून नगरपालिकेचा कर चुकावणा-या होर्डिंग धारकांची पाठ राखण करत उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमान ना करणा-या मुख्याधिकारी नगर परिषद बीड येथे अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केल्यानंतर सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त(गट -अ) नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी सह आयुक्त/उपायुक्त नगरपरिषद प्रशासन शाखा विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची आपल्या स्तरावरून शहानिशा करून उचित कार्यवाही करावी व अर्जदारास लक्ष्यवेधी आंदोलनापासून परावृत्त करावे.तसेच केलेल्या कार्यवाहीची एक प्रत संचालनालयास तात्काळ सादर करावी असे नमुद केले होते.मात्र या घटनेला ६ महिने उलटूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणात जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

**नगरपालिकेच्या सर्व्हेक्षणात ९० होर्डिंग्ज अनाधिकृत ; नगरपालिकेला १० वर्षांपासून कर भरलाच नाही :- विश्वांभर तिडके कर निरीक्षक नगरपरिषद बीड**

---मुंबई येथील घाटकोपरच्या घटनेनंतर नगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणात घर, इमारत आदी खाजगी ठिकाणी धोकादायक असे ७० होर्डिंग्ज आढळले होते.तसेच सार्वजनिक ठिकाणी १९ होर्डिंग्ज होते या ९० पैकी एकाही होर्डिंग्जला नगरपालिकेची परवानगी नसल्याचे बीड नगर परिषदेचे कर निरीक्षक विश्वांभर तिडके यांनी माहिती दिली.

**अनाधिकृत होर्डिंग्ज वर कारवाई करण्याऐवजी स्ट्रक्चर ऑडिट च्या नावाखाली अधिकृत करण्याचा नगरपालिकेचा घाट**

बीड नगरपरीषदेने बीड शहरातील अवैध ९० होर्डिंग्ज धारकांवर कसलीही कारवाई केली नाही उलट अवैध होर्डिंग्ज स्ट्रक्चरल ऑडिटने वैध करण्याचा घाट नगरपालिकेने घातला असुन खासगी अभियंत्यांमार्फत व्यावसायिकांनी होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा घाट घातला असून नगरपालिकेने या पडताळणी केली नाही याउलट नगरपालिकेचे परवानगी न घेता चौका चौकात मोठं होर्डिंग बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामुळे कर तर बुडतच आहे परंतु वाहतूकीस अडथळा निर्माण होत असुन अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

# नागपूर मध्ये शालेय सहल घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात;अपघातात एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्य



नागपूरः नागपुरात विद्यार्थांना सहलीला घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाल्याची दुर्दैवी घटना आज, मंगळवारी सकाळी ९ वाजता घडली. नागपूर-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवरील पेंढरी गावाजवळ हा अपघात झाला. अपघातग्रस्त बसमध्ये नागपूर इथल्या सरस्वती शाळेतील विद्यार्थी होते. या दुर्घटनेत अनेक विद्यार्थी जखमी झाले असून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची माहिती पुढे आली आहे. यासंदर्भातील माहितीनुसार नागपुरातील शंकरनगर परिसरातील सरस्वती शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल आज, मंगळवारी वर्धा जिल्ह्यातील बोरधरण इथे जात होती. एकूण ५ बसेस शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेऊन चालल्या होत्या. त्यापैकी ४ बस सुखरूप पुढे गेल्या परंतु, शेवटी असलेल्या बसच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून पेंढरी गावाजवळ हा अपघात झाला. यात अनेक विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ मिहान परिसरातील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलेय. दरम्यान अपघाताची माहिती मिळताच हिंगणा पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून युद्ध पातळीवर बचावकार्य सुरू आहे.

## विचार आणि आचार संकुचित होणाऱ्या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज - तुषार

विचार आणि आचार संकुचित होणा-या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज आहे असे मत गांधीवादी विचारवंत तुषार गांधी यांनी व्यक्त केले. येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे उदघाटक म्हणून तुषार गांधी बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्रख्यात सिनेअभिनेते तथा चित्रपट व मालिकांचे दिग्दर्शक किरण माने होते तर व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडु लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे उपस्थित होते. यावेळी बोलताना तुषार गांधी पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्या सारखी माणसं होवून गेली का नाही अशी शंका निर्माण होणाऱ्या परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी अशा तीन दिवसीय समारोहाचे आयोजन करण्यात येते ही खुप समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत खुप महत्वाचा वाटा आहे. महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा त्यांनी दिला. भारत चीन घ्या युद्धकाळात संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा ही त्यांनी उल.लेख केला. आजच्या परिस्थितीत संपूर्ण देशभर संविधान विरोधी वातावरण निर्माण करण्याचे काम किमी जण जाणीवपूर्वक करीत आहेत अशा परिस्थितीत याविरुद्ध सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे आवाहन तुषार गांधी यांनी केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रख्यात सिने अभिनेता दिग्दर्शक किरण माने यांनी आपल्या भाषणात किरण माने यशवंतराव चव्हाण यांच्या अंत्यसंस्कारासाठी मला उपस्थित राहता आले हे माझं भाग्य. यशवंतराव चव्हाण हे गोरगरीब, शोषीत दलीत यांच्या उध्दारासाठी झटणारे नेते होते. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी देवराष्ट्र या गावात अस-पृशांसाठी शाळा महर्षी वि. रा. शिंदे यांच्या हस्ते सुरू केली. यशवंतराव चव्हाण हे समाजकारणातुन राजकारणात आले. आमदार झाले, मंत्री झाले, मुख्यमंत्री, उपपंतप्रधान झाले. सत्तेचा कैफ आपल्या डोक्यात न जावू देणारा हा नेता होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा असला तरी निर्मितीनंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत आपला काहीही सहभाग नाही हे ठासून सांगणारा हा नेता होता. यशवंतराव चव्हाण हे तरल संवेदनशीलता, समाजभान, गरीबांची जाण असलेला नेता होता. अशा या थोर माणसांच्या विचारांचा जागर होणार महाराष्ट्रातील अंबाजोगाई हे एकमेव गाव असल्याचा आपल्या अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी दीपप्रज्वलन व यशवंतराव चव्हाण, व स्व.भगवानराव लोमटे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला औषधोपचार, व्यायाम, योग्य आहार विहार यावर नियंत्रण ठेवत, प्रथम नोकरीला आणि नंतर त्याच्या लग्नाच्या निर्णयाला सगळ्यांनीच उचलून धरले. मनात संजीवनी भरली. आनंदाच्या प्रसंगी वरवर आनंदी दाखवत दुःखाला कवटळण्याचे एक भेसूर चित्र म्हणून मी अनुभवतो तेव्हा मनात चर्र होतं. दुसऱ्याला आनंद द्यायचा, त्याचा अट्टहास पाहिला की, आनंद ही असह्य होतो. वीस-बावीस वर्षे आजारावर मात करत पन्नाशी गाठलेल्या मित्राचा आज वाढदिवस. शतायुषी व्हावे त्याने. उमदा मित्र दिल्याबद्दल देवाचे आभार मानत मी फोन उचलतो. हॅंलोऽऽऽ पलीकडून आवाज येतो. अरे काळ्या लेका पन्नाशीचा झालास गड्या. ते ऐकून मी सुखावतो. दोस्तीत चालणाऱ्या भाषेत दमटावत त्यालाही पन्नाशीची सरमरीत भेट देतो. अरे शिऱ्या तुझेही अभिनंदन. साल्या तू ही पन्नाशी गाठलीस की रे. या प्रसंगाला साजेशी गजल मला आठवते. ज्यात कवी समीर शेख बरेच काही सांगून जातात




# बीडमध्ये हेरीटेज वॉक उत्साहात संपन्न

सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांत व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक वारसा सप्ताह निमित्त दिनांक २३ नोंव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील कंकालेश्वर मंदीर येथे हेरीटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पुरातत्व विभाग,छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.कामाजी डक सर यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचबरोबर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतच्या महिला विभाग प्रमुख आणि आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.शांता जाधवर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.अनिता शिंदे यांची देखील उपस्थिती होती. यावेळी डॉ.कामाजी डक सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आपला वैभवशाली वारसा सध्या नष्ट होत चालला आहे. तरी या सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी हा वारसा जपण्यासाठी पुढे आले पाहिजे. आपल्या परिसरातील असलेला वैभवशाली ठेवा आपण जपला पाहिजे.मार्गदर्शिका डॉ. शांता जाधवर यांनी विद्यार्थ्यांना कंकालेश्वर मंदीरातील द्वार शाखा, सभामंडप, गर्भ-गृह,सभामंडपात कोरलेल्या मूर्त्या आणि स्तंभ याची विस्तृत माहिती दिली.त्याचबरोबर मंदीरावर असलेले दशावतार, कंकाल, मातृशक्ती आणि इतर मूर्त्यांची माहिती सांगितली. ही माहिती ऐकून अनेक विद्यार्थ्यांमध्ये कला आणि मूर्तीशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली. याप्रसंगी इनटॅक छत्रपती संभाजीनगर येथील अमित देशपांडे हेही उपस्थित होते. सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्रा.संजय काळे, इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतचे सचिव प्रा.शशिकांत पसारकर यांची यावेळी उपस्थिती होती. सौ.के.एस.के. महाविद्यालयातील एकूण एकवीस विद्यार्थी, विद्यार्थिनी या हेरीटेज वॉकमध्ये सहभाग घेतला. या उपक्रमा बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देंवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी अभिनंदन केल



# हा विजय माझा नाही तर कर्जत- जामखेड च्या पवित्र भूमीचा - आ. रोहित पवार

## आ. रोहित पवार यांनी कर्जत, जामखेडकरांच्या पुढे नतमस्तक होऊन केला विजयाचा स्वीकार.

( खर्डा प्रतिनिधी) -- प्रा. महेश बजगुडे

सर्वप्रथम या विधानसभेच्या विजयाबद्दल कर्जत-जामखेडमधील मतदारांपुढं नतमस्तक होऊन या विजयाचा मी नम्रपणे स्वीकार करतो. आपला विश्वास आणि प्रेम मी कदापि विसरणार नसल्याचे प्रतिपादन आ. रोहित पवार यांनी झालेल्या निसटत्या विजयानंतर आपली भावना व्यक्त केली.

हा विजय माझा नाही तर कर्जत-जामखेडच्या पवित्र भूमीचा, इथल्या स्वाभिमानी जनतेचा, सामान्य माणसाचा, निष्ठावान कार्यकर्ते, पदाधिकारी, सहकारी, मित्र, माझं कुटुंब, ममविआफ्तील घटक पक्षांचे कार्यकर्ते, माझ्यावर प्रेम करणा-या राज्यभरातील अनेकांनी दिलेला आशीर्वाद आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आणि महाराष्ट्र धर्माचा हा विजय आहे.

या निवडणुकीत खूप काही शिकायला मिळालं. गेली पाच वर्षे कर्जत-जामखेडला



माझ्या कुटुंबासारखं जपलं, प्रत्येक संकटात साथ-सोबत केली. आयुष्याचा पाया रचणारं शिक्षण, विकासाला गती देणारे रस्ते, पाणीपुरवठा, जलसंधारण, आरोग्य, पर्यटनाला चालना देणा-या अध्यात्मिक स्थळांचा विकास, मतदारसंघात निर्भय आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणं, महिला भगिनींना स्वतःच्या पायावर उभं करुन सक्षम बनवणं, त्यांना व्यवसायाच्या नवनव्या संधी उपलब्ध करुन देणं ही कामं करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.कोविड आणि लंपीसारख्या संकटात इथल्या मायबाप जनतेसोबत ठामपणे उभा राहिलो. दुष्काळात पाणी पुरवणं असो की पीक विमा मिळवून देणं असो या गोष्टी कर्तव्यभावनेतून प्रामाणिकपणे केल्या. मएमआयडीसीफ्साठी आणि या माध्यमातून युवांना रोजगार निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न तर कर्जत-जामखेडकरांना माहितच आहेत. कर्जत-जामखेडच्या मायबाप जनतेने माझ्या प्रत्येक कामात तन-मनाने साथ दिली. माझ्यावर विश्वास ठेवला. संघर्षाच्या कठीण काळात पाठीशीच नाही तर खांद्याला खांदा लावून उभं राहिले, हे मी कधीही विसरणार नाही. ही निवडणूक कसोटी पाहणारी होती. पक्ष फुटला असताना आणि आदरणीय पवार साहेब हे ८५ व्या वर्षी महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आणि विचारांसाठी संघर्ष करत असताना त्यांना साथ देण्यासाठी आणि महाराष्ट्र धर्माचा विचार जपण्यासाठी मलाही राज्यभर अनेक सभांसाठी जावं लागलं. या काळात माझ्या आवाहनाला प्रतिसाद देऊन मतदारसंघातील प्रचाराची धुरा स्वतः मरोहित पवारफ असं समजून माझ्या कर्जत-जामखेडच्या मायबाप जनतेने आपल्या खांद्यावर घेतली, हे तुमचं मप्रेमफ मी कदापि विसरणार नाही. माझा प्रत्येक क्षण हा तुमच्या कल्याणासाठी, तुमच्या भल्यासाठी, कर्जत-जामखेडच्या विकासासाठी असेल, किंबहुना कर्जत-जामखेडचं कल्याण हेच माझं कल्याण, असं मी मानतो. त्यादृष्टीनेच भविष्यातही काम करण्याचा माझा प्रयत्न राहील.

आता निवडणूक संपली, राजकारण संपलं. यापुढं मला मत दिलेल्या मतदारांचाच नाही तर मत दिलेल्या आणि न दिलेल्या सर्वांचा मी लोकप्रतिनिधी आहे. म्हणूनच काम करताना जात, धर्म, गरीब, श्रीमंत, पक्ष असा कोणताही भेदभाव माझ्याकडून कधी झाला नाही आणि यापुढंही कदापि होणार नाही. आता केवळ कर्जत-जामखेडचा विकास हेच माझं ध्येय आहे. या कामात माझ्या कर्जत-जामखेडची मायबाप जनता माझ्या पाठीशी राहिलच, यात कोणताही संशय नाही. माझे राजकीय विरोधक प्रा. राम शिंदे साहेब यांच्यासह त्यांच्या सहका-यांनीही केलेली टीका, एकमेकांवर केलेले आरोप-प्रत्यारोप हे सर्व विसरुन कर्जत-जामखेडच्या विकासासाठी एकत्र यावं. निवडणूक संपल्यामुळं राजकारणाला पूर्वविराम देऊन विकासाचा, समाजकारणाचा, महिला भगिनींना सन्मान देण्याचा, युवांना रोजगार देण्याचा, शेतकऱ्यांच्या घामाला मोल देण्याचा नवा अध्याय आपण एकत्रितपणे लिहू. प्रा. राम शिंदे साहेब हेही आणखी चार वर्षे आमदार असल्याने राजकीय मतभेद विसरुन केंद्र व राज्य सरकारकडून अधिकाधिक निधी आणण्याकामी त्यांनीही सहकार्य करावं, असं मी त्यांना आवाहन करतो.ज्या कर्जत-जामखेडने मला राज्यात ओळख दिली, काम करण्याची संधी दिली, विश्वास दिला, संघर्ष करण्याची प्रेरणा दिली त्या मतदारसंघाला नवी ओळख निर्माण करुन देण्याचा आणि विकासाचा एक स्वतंत्र चेहरा देण्याचा माझा कायमच प्रयत्न राहिलाय आणि तो यापुढंही राहील. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून कर्जत-जामखेड मतदारसंघ हा राज्यात विकासाचं एक नवं मॉडेल निर्माण करण्याचं माझं स्वप्न आहे. त्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून मी काम करत असून याकामी यापुढंही सर्वजण सहकार्य करतील, असा विश्वास आहे.

निवडणुकीच्या काळात माझ्याकडून चुकून, जाणते-अजाणतेपणाने कुणाचं मन दुखावलं असेल, कुणाविषयी चुकीचा किंवा अपशब्द वापरला गेला असेल, काही चुकीची कृती घडली असेल किंवा कुणाचा अवमान झाला असेल तर या सर्वांची मी मनापासून माफी मागतो आणि विजयाबद्दल आभार न मानता कायमच कर्जत- जामखेडकरांच्या ऋणात राहणं मला आवडेल असे शेवटी आमदार रोहित दादा म्हणाले !

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# किती वाईट आहे? सरकारचा हमीभाव फक्त कागदावरच? जळगावात कापूस उत्पादक शेतकरी रडकुंडीला

## शेतक-यांना केंद्र सरकारने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

शेतक-याचं पांढर सोनं म्हणजे कापूस. केंद्र सरकारने कापसाचा हमीभाव वाढवल्याची माहिती काही दिवसांपूर्वी समोर आली होती. पण जळगावच्या बोदवड येथील शेतक-यांना हमीभावापेक्षाही कमी पैसे मिळत असल्याचं समोर आलं आहे. इथे व्यापा-यांकडून हमीभावापेक्षाही कमी पैशात कापूस शेतक-यांकडून खरेदी केला जातोय. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकरी शेतात राबराब राबतो. आसमानी संकटांना सामोरं जात काबाडकष्ट करतो. पण जेव्हा कापूस घरात येतो तेव्हा त्या शेतक-याला हमीभाव सुद्धा न मिळणं यापेक्षा दुर्दैवी गोष्ट कोणतीच असू शकत नाही. अशा प्रकारे म ु जोरपणे शेतक-यांना लुबाडणा-या व्यापा-यांवर सरकारचा अंकुश नाही का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतोय शेतकरी हा खरंतर जगाचा पोशिंदा मानला जातो. पण याच जगाच्या पोशिंद्याला हमीभावा इतका देखील भाव त्याच्या कापसाला मिळत नसेल तर यापेक्षा दुर्दैव गोष्ट कोणतीच असू शकत नाही. एक जबाबदारी, सुजाण नागरीक म्हणून तरी शेतक-याला हमीभाव मिळवून देणं हे आपलं कर्तव्य आहे. त्यामुळे केंद्र सरकार शेतक-यांची व्यापा-यांकडून होणा-या अशा लुबाडणूकपासून सुटका करेल, अशी आशा



आहे शेतक-यांना नेमका काय भाव मिळतोय? सरासरी एक ते दीड वर्षापासून कापसाचे दर प्रति क्विंटल ७ हजारांच्या पुढे गेलेले नाही. केंद्र सरकारने २०२४-२५ या वर्षासाठी कपाशीच्या हमीभावात ५०९ रुपयांची वाढ केली आहे. त्यानुसार सीसीआयने चालू हंगाम ात मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७ हजार १२१ रुपये आणि लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार ५२१ रुपये हमीभाव जाहीर केला. पण व्यापारी हमीभावापेक्षा कमी बोली लावत असल्याने शेतकरी रडकुंडीला आला आहे. सन २013 मध्ये कापसाला प्रति क्विंटल ७ हजार ५०० रुपये दर मिळत होता. आताही केवळ ६ ते ७ हजार रुपये प्रति क्विंटल या दराने कापूस खरेदी केला जातो आहे. कपाशीचे भाव वाढतील या आशेवर अनेक शेतक-यांनी कापसाची साठवणूक केली. पण शेतक-यांना पैशांची गरज असल्यामुळे त्यांना नाईलाजास्तव कापूस विकावा लागतो आहे. व्यापारी मनमानी करून वाट्टेल त्या भावात कापूस खरेदी करत आहेत. केंद्राकडून चालू हंगामात मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७ हजार १२१ रुपये आणि लांब धाग्याच्या कापसासाठी ७ हजार ५२१ रुपये हमीभाव जाहीर झाला. खासगी व्यापारी ६,५०० ते ६,९०० रुपये प्रति क्विंटल भाव देत असल्याने नुकसान होते आहे. इतर शेतमालाचे दरही हमी भावापेक्षा खासगी बाजारात कमी असून हमी भावावर शासनाचा किती अंकुश आहे? याचा प्रत्यय शेतक-यांना येतो आहे.

# निवडणूक संपताच रश्मी शुक्लांची पुन्हा पोलीस महासंचालक पदी नियुक्ती

मुंबई : राज्यात महायुतीचं सरकार सत्तेत येण्यापूर्वीच मोठा निर्णय घेण्यात आला आहे. रश्मी शुक्ला यांची पुन्हा एकदा राज्याच्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आज सकाळी रश्मी शुक्ला यांनी आपला पदभार स्वीकाला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने पदमुक्त केलं होतं. आता पुन्हा त्यांना सेवेत दाखल करून घेण्यात आलं आहे. राज्यातल्या काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षनेत्यांचे फोन टॅपिंगचा आरोप असलेल्या रश्मी शुक्लांना निवडणुकीच्या



काळात पदावरून हटवण्यात आलं होतं. काँग्रेसने केलेल्या तक्रारीनंतर निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला होता. त्यानंतर राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती केली होती. पण त्यांच्या नियुक्तीमध्ये तात्पुरती नियुक्ती असा शब्द वापरण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीचा निकाल महायुतीच्या बाजून आला असून राज्यात आता महायुतीचं सरकार येणार आहे. त्यामुळे निकाल लागल्यानंतर लगेचच रविवारी संध्याकाळी रश्मी शुक्ला यांनी देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली होती. त्यानंतर आता रश्मी शुक्लांची पुन्हा एकदा पोलिस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली.

# श्री संत गजानन महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा.



खर्डा ( प्रतिनिधी )येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित श्री संत गजानन महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले महाविद्यालय प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे सर यांनी संविधान दिन हा देशाचा इतिहासातील एक महत्त्वाचा दिवस मानला जातो, भारतीय राज्यघटनेचा मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीकडून स्वीकारला गेला. घटनाकारांनी सुमारे ६० देशांच्या संविधानाचा अभ्यास करून त्यातल्या चांगल्या बार्बीचा समावेश भारतीय संविधानात केला, यामध्ये प्रामुख्याने ब्रिटनकडून संसदीय शासन प्रणाली, कायद्याचे राज्य, कायदे निर्मिती तर अमेरिकेच्या घटनेतून मूलभूत हक्क, न्याय मंडळाचे स्वातंत्र्य आदी बार्बीचा यात समावेश होतो. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. शिवानंद जाधव लाभले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नकुल खवले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. म ोहसीन शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर यांची मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# येणा-या स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुर्ण ताकतीने लढू, :- डॉ. योगेश क्षीरसागर

बीड : बीड मतदारसंघातील पराभवानंतर महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आज पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत बोलताना योगेश क्षीरसागर म्हणाले की, आम्हाला जर उमेदवारी लवकर फायनल झाली असती तर मॅनेजमेंट करण्यासाठी आमच्याकडे पुरेसा वेळ मिळाला असता परंतु उमेदवारी मिळण्यास उशिर झाल्यामुळे योग्य ते मॅनेजमेंट करण्यासाठी आम्हाला वेळ मिळाला नाही यामुळे अल्पशा मताने आमचा पराभव झाला. परंतु राज्यात सत्ता महायुतीची असल्यामुळे मतदारसंघातील विकास करण्यासाठी आम्ही कुठेही कमी पडणार नसल्याचे मत यावेळी पत्रकारांशी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले. तसेच सारिका क्षीरसागर यांनीसुद्धा बोलताना सांगितले की, बीड नगरपालिकेची चिंता नसावी, एक चुक परत होणार नाही अशा शब्दात त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना रोखठोक उत्तर दिले. बीड मतदारसंघातील पराभवाचा स्विकार करत योगेश क्षीरसागर व सारिका क्षीरसागर नव्या जोगामे तयारीला लागले आहेत.



येणाऱ्या दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होत असून या निवडणूकीची तयारी सुरू झाल्याचे सर्वत्र चित्र आहे. यात बीड नगरपालिका, जिल्हा परिषद या निवडणूका फेब्रुवारी-मार्चमध्ये पार पडण्याची शक्यता आहे. याच अनुषंगाने या निवडणूकीत विजय खेचून आणण्यासाठी योगेश क्षीरसागर, सारिका क्षीरसागर व त्यांची टिम तयारीला लागली आहे. बीड मतदारसंघात झालेल्या पराभवानंतर योगेश क्षीरसागर यांनी आज पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत योगेश क्षीरसागर यांचा अल्पशा मताने पराभव झाल्याचे मान्य केले. विद्यमान आमदार जर विकासकामे करत असतील तर त्यांच्या विकासकामात आम्ही व आमची टिम कसलाही अडथळा करणार नाही परंतु जर सर्वसामान्यांना त्रास व अधिकाऱ्यांना त्रास होत असेल तर मात्र एक विरोधक म्हणून आम्ही त्यांना जाब विचारू असेही मत यावेळी योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले. तसेच राज्यात महायुतीचे सरकार असल्यामुळे मतदार संघाच्या विकासासाठी आम्ही आमच्या नेत्यांकडे पाठपुरावा करूत व मतदारसंघाचा जेवढा विकास करता येईल तेवढा विकास आमदार नसताना सुद्धा आम्ही करूत असे मत यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त कले.





**मुंबई : बीड मतदारसंघातून दुसऱ्यांदा विजयी झाल्यानंतर आ.संदीप क्षीरसागर यांनी मुंबई येथे शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतली. निवडणुकीत यश संपादीत केल्याने शरद पवार ,जयंत पाटील यांनी आ.संदीप क्षीरसागर यांना शुभेच्छा दिल्या.**

# माजलगाव धरणाचे पाणी शेतीसाठी सोडा. भाई अॅड..नारायण गोले पाटील




माजलगाव/ प्रतिनिधी म ाजलगाव धरण पूर्ण क्षमतेने भरले असून माजलगाव तालुक्यातील शेतक-यांची अनेक पिके पाण्या अभावी करपत असून, गुरांना पिण्यासाठी पाणी नाही,अनेक शेतक-यांना ऊस लागवड करण्यासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असून प्रशासन निवडणुकीत गुंतल्याने शेतीसाठी पाणी सोडण्यास विलंब झाला असून अनेक शेतक-यांनी सोयाबीन पिकाची काढणी केल्यानंतर पाण्याची वाट पाहत जमिनी खाली ठेवलेल्या असून चातक पक्षाप्रमाणे शेतकरी माजलगाव धरणाचे पाणी पाटाला सोडण्याची वाट पाहत असताना देखील प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने माजलगावात शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आक्रमक होत, माजलगाव धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्याची मागणी तहसीलदार माजलगाव यांना दि.२६नोव्हेंबर रोजी निवेदनाद्वारे केली असून शेतीसाठी पाणी न सोडल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशारा शेकाप नेते भाई अॅड. नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, भाई राजाभाऊ शेरकर, हनुमान डाके,भागवत कोळसे आदिंनी दिला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com